# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाठिंब्याने बचत गटांचा**
- **१२व्या आशिया-पॅसिफिक 3R फोरममध्ये सहभाग**

**जयपूर, राजस्थान | ७ मार्च २०२५:-** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समाजविकास विभागाच्या पाठिंब्यामुळे गोल्डन डॉन बचत गटाला आशिया आणि पॅसिफिकमधील १२व्या प्रादेशिक 3आर अर्थात रिड्यूस, रियूज, रिसायकल फोरममध्ये सहभाग घेण्याची संधी मिळाली. जयपूर येथील राजस्थान इंटरनॅशनल सेंटरमध्ये ३ ते ५ मार्च दरम्यान आयोजित या फोरममध्ये महाराष्ट्रातील शहर उपजीविका केंद्रासोबत मिरा भाईंदर बचत गटानेही आपली उत्पादने प्रदर्शित केली.

या प्रदर्शनात बचत गटांनी पेपर डॉल्स, पेपर प्लेट्स, मिरर फ्रेम, वूलन झुला फ्लॉवर, वारली पेंटिंग आणि विविध पर्यावरणपूरक वस्तू सादर केल्या. या कलात्मक आणि टिकाऊ उत्पादनांमुळे महाराष्ट्राच्या समृद्ध पारंपरिक वारशाचे दर्शन घडले.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव श्री. के. एच. गोविंदाराज (भा. प्र. से.), स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे राज्य अभियान संचालक श्री. नवनाथ वाठ, तसेच उपसंचालक श्री. महेश चौधरी यांनी या स्टॉलला भेट देऊन बचत गटांच्या उत्पादनांची माहिती घेतली. या उत्पादनांद्वारे महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, त्यांचे कौशल्य आणि उत्पादने देशभर पोहोचतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**महानगरपालिकेच्या समाजकविकास विभागाचा महत्त्वाचा सहभाग**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समाजविकास विभागाने वेळोवेळी बचत गटांना पाठिंबा दिला असून, त्यांना राष्ट्रीय स्तरावरील अशा महत्त्वाच्या मंचांवर सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली. या फोरममध्ये सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेने विशेष सहकार्य केले.

या उपक्रमामुळे बचत गटांच्या उत्पादनांना मोठी मागणी मिळण्याची शक्यता असून, त्यांना नवीन बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल. पर्यावरणपूरक आणि पुनर्वापरयोग्य वस्तूंच्या वाढत्या गरजेमुळे अशा बचत गटांचे योगदान अधिक महत्त्वाचे ठरत आहे.